नियमित दिवाणी दावा क्र. ५०/२००८.
रमेश व ईतर विरूध्द नाथा व ईतर

## निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिते मधील आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातूर्त मनाई हुकुम मिळावा म्हणुन दाखल केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जातील वादीचे कथन थोडक्यात असे आहे की, मौजे ईसारवाडी ता. पैठण जि. औरंगाबाद येथील मिळकत जमीन सर्व्हे नं.६८/१ क्षेत्रफळ ०२ हेक्टर ६३ आर, आकार ५ रूपये २१ पैसे व ज्यांचे विस्तृत वर्णन दावा परिच्छेद १ मध्ये दिले आहे सदर मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित व हिंदु एकत्र कुटुंबाच्या मिळकत आहे. वादीचे असे कथन आहे की वादी व प्रतिवादी यांच्या घराण्याचे मुळ पुरूष केरू भिका यांच्या नावावर वादग्रस्त मिळकत होती व सध्या ती मिळकत प्रतिवादी नं १ ते ३ यांच्या नावावर आहे. त्यामुळे सदर वडिलोपार्जित मिळकतीत वादींचा हिस्सा असल्याने सदर वादग्रस्त मिळकतींची सरस निरस मानाने वाटणी होवुन ताबा मिळण्यासाठी वादीने सदर दावा दाखल केलेला आहे व दाव्याचा निकाल लागेपर्यंत, वादीने शेवटी वादग्रस्त मिळकती प्रतिवादी क्रमांक १ ते ३ व यांच्या विरूध्द त्यांनी वादग्रस्त मिळकती कोणासही कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करू नये अशा प्रकारचा तुर्तातूर्त मनाई हुकुम मिळण्याची विनंती केली आहे.

०३. दाव्याचे समन्स तामिल होवुन प्रतिवादी दाव्यात हजर झाले. प्रतिवादी १ यांनी त्यांची लेखी कैफियत निशाणी १८ वर दाखल केली आहे. प्रतिवादींचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे आहे. प्रतिवादींनी वादीचे दाव्यातील कथन अमान्य केले असून प्रतिवादींचे असे कथन आहे की, मौजे ईसारवाडी ता. पैठण

शिवारामधील जमीन स.नं. ६८ एकुण क्षेत्रफळ २० एकर १७ गुंठे ही जमीन दि. ०८/०४/१९५६ रोजी भिका पिता हनुमंता याने पुर्वीच्या मालकाकडून रजि. खरेदीखता आधारे विकत घेतलेली जमीन आहे. त्याच प्रमाणे भिका यांने मौजे ईसारवाडी ता. पैठण येथील जमीन गट नं ६६ एकुण क्षेत्रफळ ३१ एकर १६ गुंठे ही जमीन देखील दि. ०५/०७/१९५८ रोजी त्याचा मुलगा मोहन पिता भिका याचे नावावर स्तः पैसे देवुन रजि. खरेदीखता आधारे विकत घेतली आहे. भिका पिता हनुमंता यांच्या सर्व्हे नं. ६६ व ६८ या दोन्ही जमीनीमध्ये समान तीन हिस्से झालेले आहेत. दोन्हीही जमीनीमध्ये भिकाच्या तीन्ही मुलांना व त्यांचे वारसांना सरस निरस मानाने वाटणी हिस्से आलेले आहेत. वादी व प्रतिवादी हे केरू पिता भिका यांचे वारस आहेत. सर्व्हे नं ६६ व ६८ जमीनीचे ७/१२ उता—यावर वाटणी हिश्याप्रमाणे नोंदी लागलेल्या असुन जो तो ज्याचे त्याचे हिश्याप्रमाणे काबीज आहे. वादी विठठ्ल पिता केरू यांचे वारस आहेत. विठठ्ल पिता केरू यास जमीन स.नं ६६ मध्ये ६६/२—ब क्षेत्रफळ २ हेक्टर ३ आर वारसा हक्काने वाटणीत आली आहे व त्याच जमीनीमध्ये वादींचा कायदेशीर हिस्सा व हक्क आहे व वादग्रस्त मिळकत ही प्रतिवादी नं १ नाथा यास वाटणी हिश्यात आलेली असल्याने वादींचा त्याचप्रमाणे विठठ्लच्या वारसांचा व भिमरावच्या वारसांचा कुठल्याही प्रकारचा हक्क संबंध नाही. त्यामुळे वादीचा दावा व निशाणी ५ चा अर्ज खारीज करण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे. प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांनी निशाणी ६२ वर त्यांची लेखी कैफियत दाखल केली आहे त्यामधील मजकुर हा प्रतिवादी नं १ यांनी निशाणी १८ वर दाखल केलेल्या लेखी कैफियतीप्रमाणेच आहे. प्रतिवादी नं ६ यांनी त्यांची लेखी कैफियत निशाणी २७ वर दाखल केली आहे. या प्रतिवादीचे थोडक्यात कथन असे आहे की, वादी व प्रतिवादी यांनी वडिलोपार्जित जमीन मिळकतीमध्ये प्रतिवादी नं ६ चा कसलाही विचार न करता हिस्सा डावलला आहे त्यामुळे वादी व प्रतिवादी कडुन प्रतिवादी नं ६ ला वडिलोपार्जित प्रॉपर्टीचा हिस्सा मिळावा व वादीचा दावा व अर्ज

हा खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली आहे. बाकी प्रतिवादी यांनी निशाणी ६१ वर पुरशीस देवुन प्रतिवादी नं १ ने दिलेली लेखी कैफियत त्यांच्यासाठी गृहित धरण्याची विनंती केली आहे.

०५. प्रस्तुत अर्जाच्या निर्णय कामी खालील मुददे विचारात घेणे मला आवश्यक वाटते.

| | *मुद्दे* | *निष्कर्ष* |
|---|---|---|
| १) | वादीने प्रथमदर्शनी त्याची केस सिध्द केली आहे काय ? | होकारार्थी |
| २) | न्यायाचा समतोल वादीच्या हक्कात आहे काय ? | होकारार्थी |
| ३) | तूर्तातूर्त मनाई हुकुम नामंजुर केल्यास वादीचे न भरून येणारे नुकसान होणार आहे काय? | होकारार्थी |
| ४) | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

०६. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांचा अर्जाच्या अनुषंगाने युक्तीवाद ऐकला. त्यांचा युक्तीवाद, दाव्यातील दाखल कागदपत्रे यावरून वरील मुदद्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे करण्यात येत आहे व त्या मुदद्यांच्या अनुषंगाने मी माझे निष्कर्श नोंदवत आहे.

## : कारणमिंमासा :

**मुददा क्रं. १ ते ४ साठी.**

०७. मुळ दावा वादग्रस्त मिळकतीचे वाटप होवुन मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. वादी व प्रतिवादी यांचे नाते उभय पक्षांना मान्य आहे. वादग्रस्त मिळकत ही वादी व प्रतिवादींची वडिलोपार्जित मिळकत आहेत हे दाखवण्यासाठी वादींनी वादग्रस्त मिळकतीचे ७/१२ उतारे दाखल केले आहेत तसेच फेरफार क्रमांक ४३९, ६६४ दाखल केले आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादग्रस्त मिळकत ही वादी व प्रतिवादींची वडिलोपार्जित मिळकत असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. वादग्रस्त मिळकतीचे वादी व प्रतिवादींमध्ये वाटप झालेले

आहे असे प्रतिवादींनी लेखी कैफियतमध्ये कथन केले आहे, परंतु प्रतिवादींनी वादग्रस्त मिळकतीचे वाटप झालेले आहे असे दाखवण्यासाठी कुठलेही कागदपत्र दाखल केलेले नाही. अशा परिस्थीतीमध्ये वादींचा वादग्रस्त मिळकतीमध्ये प्रथमदर्शनी हक्क व हितसंबंध आहे असे दिसते. वादग्रस्त मिळकती प्रतिवादींच्या नावे आहेत. अशा परिस्थीतीमध्ये दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादींनी त्यांच्या नावावरील वादग्रस्त मिळकतींची त्रयस्थ व्यक्तीकडे विल्हेवाट लावल्यास वादींना वादग्रस्त मिळकतीमधील त्यांचा हक्कसंबंधाची मागणी पुर्ण करण्यास अडथळा निर्माण होवु शकतो व पर्यायाने वादीचे न भरून येणारे नुकसान होवु शकते.

०८. वरील सर्व विवेचनावरून प्रथमदर्शनी हे सिध्द होते की, प्रथमदर्शनी केस वादीच्या हक्कात आहे व न्यायाचा समातोलही वादीच्या हक्कात आहे. अशा परिस्थितीमध्ये वादीच्या हक्कात तुर्तातूर्त मनाई हुकुम न दिल्यास वादीची गैरसोय तसेच न भरून येणारे नुकसान होवु शकते, त्यामुळे मुददा क्रमांक १ ते ३ चा निष्कर्श होकारार्थी नोंदवण्यात येत आहे व मुददा क्रमांक ४ च्या निष्कर्शाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश.

१) वादीचा निशाणी क्रमांक ५ वरील अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्रं १—अ ते १—ई तसेच प्रतिवादी क्रं. २ व ३ यांनी दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत वादग्रस्त मिळकत कोणासही कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करू नयेत.

स्वाक्षरीत/—

( बी. एन. चिकणे )
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
पैठण.

दिनांकः— २६/०३/२०१५.

***Certificate***

I affirm that the contents of this P.D.F file Exh.5 order are same, word to word, as per the original Exh.5 order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | :- ***Abhay Harihar Kulkarni*** |
| Court | :- Civil Judge (J.D.) Paithan |
| Date | :- 26/03/2015 |
| Exh.5 order signed by the presiding officer on. | :- 27/03/2015 |
| Exh.5 order uploaded on | :- 27/03/2015 |